# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : ९
## सभावृत्तांत

दिनांक : ६/११/२००९ वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.६/११/२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.एकनाथ मोटे
४. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
५. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
७. मा.खोमणे लता हनुमंत
८. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
९. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त, मा.चाकणकर- उपनगरसचिव, मा.बनकर,मा.निकम,मा.ढगे,मा.कपिले,मा.इंगळे - कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-

विषय क्रमांक :-२०) आकुर्डी दवाखान्याशेजारी रिटेनिंग वॉल बांधणेबाबत...

विषय क्रमांक :- २१) आकुर्डी येथे दुमजली संडास ब्लॉक बांधणेबाबत..

विषय क्रमांक :- २२) यमुनानगर मधील महिला व बालकल्याण इमारतींवर दुसरा मजला बांधणेबाबत..

विषय क्रमांक :- २३) प्रभाग क्र. ७६ रहाटणी येथील रस्त्यांचे खडीकरण करणे कामामधुन वॉर्डातील अंतर्गत रस्ते करणेबाबत..मा.खंडुशेठ कोकणे,मा.सिध्देश्वर बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २४) वॉर्ड क्र.१२ च-होली गाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणेबाबत..
मा.एकनाथ मोटे,मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २५) वॉर्ड क्र.२३ गुळवेवस्ती येथे सांस्कृतिक भवन बांधणे अंतर्गत उद्यान विकसीत करणेबाबत..मा.खंडुशेठ कोकणे, मा.सिध्देश्वर बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २६) भोसरी येथील बापुजी बुवा चौकात कमान बांधणेबाबत..मा.खंडुशेठ कोकणे,मा.सिध्देश्वर बारणे यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.प्रकाश बाबर  अनुमोदक : मा.सिध्देश्वर बारणे

शुक्रवार दिनांक १३/११/२००९ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

मा.सभापती :- शुक्रवार दि.१३/११/२००९ रोजी दुपारी २:४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

----------

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ९
सभावृत्तांत
(दिनांक ६/११/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक : १३/११/२००९ वेळ : दुपारी २:४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ६/११/२००९ ची तहकुब सभा शुक्रवार दि.१३/११/२००९ रोजी दुपारी २.४५ वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती

याशिवाय मा.चाकणकर - उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती : सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने शुक्रवार दि.२०/११/०९ रोजी दु.१.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ९
<u>सभावृत्तांत</u>
(दिनांक ६/११/२००९ व १३/११/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक : २०/११/२००९ वेळ : दुपारी १:४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १३/११/२००९ ची तहकुब सभा शुक्रवार दि.२०/११/२००९ रोजी दुपारी १.४५ वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
४. मा.खोमणे लता हनुमंत
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
६. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.पवार - प्रशासन अधिकारी,मा.चाकणकर -उपनगरसचिव, मा.थोरात,मा.बनकर,मा.कपिले,मा.जाधव - कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

ठराव क्रमांक :- १७४ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : झोनिपु
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/६/कावि/१९१/०९ दि.२०.६.०९
विषय :- कै.महेश गायकवाड यांचे वारसांना मदत करणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १७५ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : विद्युत क प्रभाग
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कप्र/वि/जा/६२६/०९ दि.१७.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

भोसरी येथील विद्युत दाहीनी करीता जनित्रसंच बसविणेकामी र.रु. २२,२५,८००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १७६ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : भुगयो
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१२०/०९ दि.२०.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

भुगयो अंतर्गत भोसरी पी एस १ व पी एस २ पंप हाउसेस येथे स्टॅण्डबाय पंप बसविणेकामी र.रु. ४४,०९,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १७७ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : जलशुध्दीकरण
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/२६५/०९ दि.१७.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

मनपाच्या अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथील पंपींग मशिनरीची वार्षिक पध्दतीने दुरुस्तीची कामे करणे(कालावधी ६० महिने)कामी र.रु.३१,७८,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १७८ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : पाणीपुरवठा क प्रभाग
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कप्र/कावि/१३६०/०९ दि.१७.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

क प्रभागातील भोसरी भागातील जलवाहिन्यावरील नादुरुस्त झालेले वॉल्व बदलणे व वितरण व्यवस्थेचे देखभाल दुरुस्ती करणेकामी र.रु. ४२,७४,१९५/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १७९ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/९२४/०९ दि.२५.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

"वैद्यकिय अधिकारी" अभिनामाची पदे भरणेकामी गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची सोबतचे परिशिष्ट "अ" येथील प्रवर्गनिहाय निवड यादीमधील उमेदवारांचे नियुक्तीस तसेच निवड यादीमधील उमेदवार विहित मुदतीमध्ये रुजू न झालेस अथवा भविष्यामध्ये जसजशी "वैद्यकिय अधिकारी" अभिनामाची पदे रिक्त होतील तेव्हाप्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना "वैद्यकिय अधिकारी" पदावर नेमणुका देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८० विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कअ/वा.क/७८२/०९ दि.२४.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य चौकातील वाहतुक सुधारणा करणेसाठी विकास कामे करणेकामी र.रु.४७,२०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८१ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : पाणीपुरवठा
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/१४०३/०९ दि.२५.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

प्रभाग क्र.४३ अजंठा नगर येथे राहिलेल्या ठिकाणी मुख्य व अंतर्गत जलनि:सारण नलिका टाकणेकामी र.रु.४९,९७,३९८/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८२ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : विद्युत क प्रभाग
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कप्र/वि/जा/६२७/०९ दि.२०.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

भोसरी रुग्णालयामध्ये वाढीव क्षमतेचे जनित्र बसविणेकामी र.रु.१८,६२,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८३ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : विद्युत अ प्रभाग
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/वि/२७१/०९ दि.२४.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

अ प्रभागांतर्गत प्र क्र.४४ से.क्र.२१ मधील यमुनानगर निगडी मधील स्कीम नं. ३,४,५,११. ठाकरे ग्राउंड, मॉडर्न हायस्कुल, एल.आय.सी.इनकम टॅक्स, महाराष्ट्र बँक व आरती सोसायटी या परिसरातील रस्त्यावरील स्ट्रिटलाईट दिव्यांचे नुतनीकरण करणेकामी र.रु.४९,८८,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८४ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : विद्युत अ प्रभाग
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/वि/२७५/०९ दि.२६.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

अ प्रभागांतर्गत वॉर्ड क्र.३८ शाहुनगर मधील स्ट्रिटलाईट दिव्यांचे नुतनीकरण करणेकामी र.रु.४९,७५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८५ विषय क्रमांक :- १२
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/४९९/०९ दि.२७.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

थेरगाव वॉर्ड क्र.८५ मध्ये उर्वरीत रस्ते बी.बी.एम. व हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी र.रु. ३८,४०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८६ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य ड
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/४९८/०९ दि.२७.८.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

थेरगाव वॉर्ड क्र.८५ मध्ये गल्लीबोळात इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकामी र.रु. ३०,९०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८७ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य ड
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/४९७/०९ दि.२७.८.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

थेरगाव वॉर्ड क्र.८२ मध्ये गल्लीबोळात इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकामी र.रु.३०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८८ विषय क्रमांक :- १५
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थापत्य/अप्र/९८०/०९ दि.२७.८.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

वॉर्ड क्र.६ चिखली येथील बैलगाडया शर्यतीसाठी घाट बांधणेकामी २४,९१,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८९ विषय क्रमांक :- १६
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.एकनाथ मोटे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/जा/कावि/१८७/०९ दि.८.१०.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

गुलाबपुष्प उद्यानाची सिमाभिंतीची आवश्यक सुधारणा करणे व आवश्यक दुरुस्ती व सुधारणांची कामे करणेकामी र.रु.३३,५८,४००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९० विषय क्रमांक :- १७
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : भुगयो
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१८४/०९ दि.२३.१०.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

आकुर्डी व चिखली सनं १२५३ व मोरे वस्ती मैला पंप हाउसेस चालन देखभाल दुरुस्तीकरीता देणेकामी र.रु.४८,३९,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९१ विषय क्रमांक :- १८
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : भुगयो
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१८३/०९ दि.२३.१०.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

भुगयो अंतर्गत भोसरी स.नं.२१७,२३१, पी.एस.१ व पी.एस २पंप हाउसेस चालन देखभाल दुरुस्ती करीता देणेकामी र.रु.४९,७२,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९२ विषय क्रमांक :- १९
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/११२६/०९ दि.२६.१०.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

प्रभाग क्र.५,६,७ व ८ मध्ये नव्याने विकसित होणा-या भागाचे रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी र.रु.२५,६०,५००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

## सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -

ठराव क्रमांक :- १९३ विषय क्रमांक :- २०
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/१०१३/०९ दि.२.०९.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

आकुर्डी दवाखान्याशेजारी १२.०० मी.रस्त्याच्या कडेला असलेल्या रिटेनिंग वॉल बांधणे व नाल्याची उंची वाढविणेकामी र.रु.२५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९४ विषय क्रमांक :- २१
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य अ प्रभाग
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/स्था/१२२७/०९ दि.६.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

आकुर्डी वॉर्ड क्र.५१ दत्तवाडी येथे जुने शौचालय पाडुन नविन २६ सिट्सचे दुमजली संडास ब्लॉक बांधणेकामी र.रु.४९,४४,०९०/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९५ विषय क्रमांक :- २२
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य अ प्रभाग
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/स्था/१२२५/०९ दि.५.११.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

प्र.क्र.४४ यमुनानगर मधील महिला व बालकल्याण इमारतींवर दुसरा मजला बांधणेकामी र.रु.१८,८७,८१५/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९६ विषय क्रमांक :- २३
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.खंडुशेठ कोकणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.खंडुशेठ कोकणे,मा.सिध्देश्वर बारणे यांचा प्रस्ताव :-
विषय :- प्रभाग क्र.७६ रहाटणी येथील (स.न. ४०) विकास योजनेतील १२.०० मी रुंद रस्त्याचे खडीकरण करणे कामामधुन वॉर्डातील अंतर्गत रस्ते करणेबाबत (नि.क्र.१५/२८ - २००८/०९ अ र.रु.४९,१७,५००/- )

प्रभाग क्र.७६ रहाटणी येथील (स.न.४०) मधुन जाणा-या विकास आराखडयातील १२.०० मी.रुंद रस्त्याची जागा मनपाच्या ताब्यात देण्याची जागामालकांनी संमती दर्शविली होती. विषयांकित कामाचा आदेश दि.२७/०२/२००९ रोजी देणेत आला आहे. पण त्यानंतर संबंधित जागामालकांनी सदरचा डी.पी.रस्ता ३.०० मी.ने स्थलांतरीत करणेबाबत अट घातली आहे. त्यासंबंधीत व जागा ताब्यात घेणेबाबत नगररचना विभागामार्फत पुढील कार्यवाही चालु आहे व त्यास वेळ लागणार आहे प्रभाग क्र.७६ मधील अंतर्गत रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडलेले असून नागरीकांच्या सोईच्या दृष्टीने सदर कामातुन वॉर्डातील अंतर्गत रस्ते करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९७ विषय क्रमांक :- २४
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.एकनाथ मोटे,मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव :-

वॉर्ड क्र.१२ च-होलीगांव येथील नागरीकांना स्थानिक ठिकाणी आरोग्य केंद्र उपलब्ध नसल्यामुळे आरोग्य विषयक बाबींकरीता भोसरी येथे जावे लागते. नागरीकांची गैरसोय टाळण्याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने वॉर्ड क्र.१२ च-होलीगाव येथे नव्याने आरोग्य केंद्र सुरु करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक :- १९८ विषय क्रमांक :- २५
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.खंडुशेठ कोकणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.खंडुशेठ कोकणे,मा.सिध्देश्वर बारणे यांचा प्रस्ताव :-

वॉर्ड क्र. २३ गुळवेवस्ती मधील एम.आय.डी.सी. 'एस' ब्लॉकमधील मोकळी जागा क्र.३९ या जागेवर सांस्कृतिक भवन बांधणे या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.४०४ दिनांक १८/०८/०८ अन्वये र.रु.१,१८,७२,५००/- स मान्यता मिळालेली आहे. सदरची जागा एम.आय.डी.सी.ने मनपास उद्याने व झाडे लावणे याकरीता हस्तांतरीत केली असल्यामुळे सांस्कृतिक भवन बांधणेकरीता बांधकाम परवानगी देणेचे एम.आय.डी.सी.कडुन नाकारण्यात आले आहे. सांस्कृतिक भवन ऐवजी उद्यान विकसित

करणेच्या कामास सुधारीत आराखडयाप्रमाणे मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सबब वॉर्ड क्र.२३ गुळवेवस्ती मधील एम.आय.डी.सी. 'एस'. ब्लॉक मोकळी जागा क्र.३९ या जागेवर सांस्कृतिक भवन बांधणेऐवजी उद्यान विकसित करणेच्या कामास व त्याच्या रक्कम रुपये ३१,६०,०००/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९९ विषय क्रमांक :- २६
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.खंडुशेठ कोकणे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.खंडुशेठ कोकणे,मा.सिध्देश्वर बारणे यांचा प्रस्ताव :-

भोसरी येथील बापुजी बुवा चौकाचे रुंदीकरण करण्यात आलेले असुन सदर चौकाचे सुशोभिकरण करणेच्या दृष्टीने त्याठिकाणी आकर्षक कमान बांधणे आवश्यक असल्याने भोसरी येथील बापुजीबुवा चौकामध्ये कमान बांधणे कामास व त्यासाठी येणा-या अंदाजे र.रु.४०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ १२७८/०९
दिनांक- २३ /११/२००९ चे लगत सही/-

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.